# जिल्हास्तरीय जलसाक्षरता समिती

संदर्भ:- शासन निर्णय क्र वाल्मी-२०१६/प्रक्र. ६९/१६ लाक्षेवि (आस्था) दिनांक ३०/११/२०१६

महोदय,

मा. विभागीय आयुक्त महादयांचे अध्यक्षतेखाली दिनांक २७/१०/२०१७ ला जिल्हा स्तरीय जलसाक्षरता समितीची आढावा बैठक संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये जिल्हयातील जलकर्मी (सेवेतील तांत्रिक अधिकारी),जलप्रेमी (जिल्हास्तर) एकुण दहा पदे व जलदुत (तालुका स्तर ) प्रति तालुका दहा पदे अशी एकुण चौदा तालुक्याकरीता १४० पदांकरीता स्वयंस्फुर्तीने काम करणाऱ्या इच्छुकांची निवड त्वरीत करण्याची सुचना बैठकीमध्ये देण्यात आल्या.

**जलकर्मी:**- शासनाच्या तसेच शासनास सहाय्यकारी संस्थामधील जलसाक्षरतेचे काम करण्यास इच्छुक अधिकारी/कर्मचारी तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी-पाणी पुरवठा व स्वच्छता, ग्रामविकास, सार्वजनिक बांधाकाम, नगर विकास, वन, महसुल, कृषी, जलसंधारण, जलसंपदा, पर्यावरण कृषी आयुक्तालय/भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा. जलकर्मीची संख्या किमान तीस असेल.

**जलप्रेमी:**- १) शक्यतो कोणत्याही शाखेचा पदवीधर
२) जलसंधारणाबाबत पुरेसे ज्ञान, सिंचन प्रकल्पाची रचना, धरण व कालव्याची संरक्षण याबाबत ज्ञान
३) जलक्षेत्रातील कामाचा अनुभव
४)जलविषयक संस्थाशी संबंधीत प्रशिक्षक असल्यास प्राधान्य

**जलदुत:**- शक्यतो बारावी/ पदविका उत्तीर्ण/ जलक्षेत्रातील कामाचा अनुभव.

जलकर्मी व जलदुत यांची निवड जिल्हा स्तरीय समितीने करावयाची आहे. तर जलप्रेमी यांची निवड विभागीय स्तरावरील समितीने करावयाची आहे. त्याकरीता जिल्हास्तरीय समितीने मा. आयुक्त यांना जिल्हाप्रेमी करीताची यादी सादर करावयाची आहे.

जलकर्मी,जलदुत व जलप्रेमी यांची निवड प्रक्रिया ३०/११/२०१७ पुर्वी पुर्ण करावयाची सुचना मा. विभागीय आयुक्त महोदयांनी बैठकीमध्ये दिल्या त्या अनुषंगाने २०/११/२०१७ पर्यंत जलप्रेमीची यादी तयार करुन पुढील कार्यवाहीसाठी मा.आयुक्त महोदयांना सादर करावयाची आहे. या करीता प्रेस नोट व निवडीकरीता अर्जाचा नमुना सोबत सलग्न आहे.

१)जलकर्मी ३० पदे
२)जलप्रेमी १० पदे
३)जलदुत प्रती तालुका १० पदे
४)उमेदवारांकडून अर्ज मागविण्याचा कालावधी १/११/२०१७ ते १५/११/२०१७

अवलोकनार्थ व मंजुरीस सादर.

सदस्य सचिव व
कार्यकारी अभियंता
उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभाग
अमरावती

अध्यक्ष व
जिल्हाधिकारी अमरावती

# प्रेसनोट

जलसाक्षरता केंद्र यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी , पुर्ण जलकर्मी (सेवेतील तांत्रिक अधिकारी), जिल्हा आणि तालुकास्तरीय जलनायकांची निवड करण्याच्या अनुषंगाने जलनायक जलप्रेमी (जिल्हास्तर) एकुण १० पदे व जलनायक जलदुत (तालुकास्तर) प्रत तालुका १० पदे असे एकुण १४० पदांकरीता कुठलेही मानधन न घेता स्वयंस्फुर्तीने काम करण्यास इच्छुक असणाऱ्या पात्र उमेदवारांकडुन अर्ज दिनांक १/११/२०१७ ते १५/११/२०१७ पर्यंत मागविण्यात येत आहे अर्ज भरण्याच्या संदर्भित माहिती व अर्जाचा नमुना www.amaravati.nic.in या संकेतस्थावर उपलब्ध असून ईच्छुक पात्र उमेदवारांनी अर्ज भरुन कार्यकारी अभियंता, उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभाग अमरावती या कार्यालयास किंवा ईमेल आयडी. eedduwpamt@gmail .com या पत्यावर दिनांक १५/११/२०१७ पर्यंत पाठविण्यात यावा.

कार्यकारी अभियंता
उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभाग
अमरावती

**जलनायक (जिल्हास्तर ) जलप्रेमी व जलनायक (तालुकास्तर) जलदूत निवडीकरीता करावयाचा**

अद्यावत काढलेला फोटो चिकटावा

**अर्जाचा नमुना**

१. पदाचे नाव :------------------------------------------------------------------------------------

२. अर्जदाराचे संपूर्ण नाव :------------------------------------------------------------------------------------

३. लिंग :-पुरुष---------------किंवा स्त्री-----------------

४.अर्जदाराचा संपूर्ण पत्ता :------------------------------------------------------------------------------------

५. भ्रमणध्वनी :- -----------------------------------------------------------------------------------

६. शैक्षणिक अर्हता :- -----------------------------------------------------------------------------------

७. जन्मदिनांक :- दि.-------------------महिना-------------------वर्ष---------------------

८.संगणकीय अर्हता :- ------------------------------------------------------------------------------------

९. जलविषयक शासकीय/ अशासकीय/ समाजसेवी संस्थांशी प्रशिक्षक असल्यास-

संस्थेचे नांव :- -----------------------------------------------------------------------------------

१०. जलक्षेत्रातील कामाचा अनुभव :- ------------------------------------------------------------------------------

अर्जदाराची सही